लोकमत पु-पा-२.

# चोरी झालेला मुद्देमाल मिळाला परत

## ६ गुन्ह्यांतील ३९ लाखांच्या वस्तू नागरिकांना सोपविल्या : नालासोपारा पोलिसांचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नालासोपारा पोलिस ठाण्यातील ६ गुन्ह्यांमधील ३९ लाख १५ हजार २८२ रुपयांचा मुद्देमाल त्या-त्या नागरिकांना पोलिसांनी परत केल्याची माहिती सोमवारी संध्याकाळी पत्रकार परिषदेदरम्यान दिली. मुद्देमाल हस्तांतरणादरम्यान संबंधितांना पोलिसांनी कायदेशीरची बाबींची पूर्तता करून मुद्देमाल दिल्याने त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते.

नालासोपारा पोलिस ठाण्यात दाखल चोरी, घरफोडी, फसवणूकसारख्या गुन्ह्यांचा पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपास करून आरोपींनी चोरलेले सोन्या-चांदीचे दागिने, मोबाइल, दुचाकी, रोख रक्कम असा विविध गुन्ह्यांतील ३९ लाख १५ हजार २८२ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत करून नागरिकांना परत केला. ही कामगिरी पोलिस आयुक्त मधुकर पाण्डेय यांच्या आदेशाने पो.उपायुक्त जयंत बजबळे यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस आयुक्त विजय लगारे, नालासोपारा वरिष्ठ पोलिस निरीक्षक सदाशिव निकम, पोलिस निरीक्षक राजकुमार कोथमिरे, गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक राजेंद्र चंदनकर, पोलिस उपनिरीक्षक राजेश मोरे, तसेच अंमलदार यांनी केली आहे.



विविध गुन्ह्यांतील लाखोंचा मुद्देमाल पोलिसांनी नागरिकांना परत केला.

### या गुन्ह्यातील मुद्देमालाचा तपास

श्रीप्रस्था येथील लोटस अपार्टमेंटमध्ये जिमखाना नावाचे वाईन शॉप आहे. ७ डिसेंबरला रात्री या शॉपच्या शटरची कडी, लॉक तोडून चोरट्याने दुकानात प्रवेश करून काऊंटर व ऑफिसच्या तिजोरीतील सोने, हिरे, मोती, रक्कम चोरली होती. त्यातील मुद्देमाल परत करण्यात आला. आगाशी क्रॉस नाका येथे राहणारे मनोज कामत (५६) यांनी २३ डिसेंबरला नालासोपारा पोलिसात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला होता. त्यांचाही २५ लाख ८ हजारांचे सोने, परत केले. २०१३ सालच्या खुनाच्या गुन्ह्यातीलही मुद्देमाल परत केला.

लोकमत पु-पा-१.

# मीरा-भाईंदरमध्ये आजी-माजी आमदार निवडणुकीच्या रिंगणात

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघातून सोमवारी विविध उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज भाईंदर येथील अपर तहसीलदार कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केले. यावेळी उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन करत मिरवणुका काढल्या. महायुतीत हा मतदारसंघ स्वतःकडे ठेवण्यात भाजप यशस्वी ठरला असल्याची चर्चा असली तरी अजून उमेदवार निश्चित न झाल्याने आ. गीता जैन, माजी आ. नरेंद्र मेहता व त्यांच्या पत्नी सुमन यांनी भाजपसह अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरले आहेत.

मीरा-भाईंदरवरून महायुतीत शिंदेसेना व भाजपमध्ये अटीतटीची चुरस आहे. आ. जैन यांनी महायुतीत कमळ किंवा धनुष्यबाण जे दिले जाईल त्यावर निवडणूक लढवण्याची तयारी केली. रविवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत मीरा-भाईंदर हे भाजपला सोडल्याचे सांगण्यात आले.



भाईंदर येथे आ. गीता जैन यांच्यासह अन्य उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन करत मिरवणुका काढून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

### भाजप अन् अपक्षही

सोमवारी भाईंदरच्या अपर तहसीलदार कार्यालयात इच्छुकांनी आपले उमेदवारी अर्ज भरले. आ. जैन यांनी भाजप आणि अपक्ष म्हणून अर्ज भरला. बालाजीनगरपासून त्यांनी रॅली काढत शक्तिप्रदर्शन केले. त्यांच्या रॅलीत भाजप व शिवसेनेचे झेंडे दिसत होते. मेहता व त्यांच्या पत्नी सुमन यांनीही भाजपचा व अपक्ष म्हणून अर्ज भरला. मेहतांनी त्यांच्या ६० फूट मार्गावरील कार्यालयापासून रॅली काढली.

### काँग्रेससह अपक्ष सज्ज

महाआघाडीचे उमेदवार मुझफ्फर हुसेन यांनीही काँग्रेस, उद्धवसेना, राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांसह रॅली काढली. अपक्ष उमेदवार माजी उपनगराध्यक्ष अरुण कदम, मनसेचे संदीप राणे, राष्ट्रीय स्वराज्य पक्षाचे ॲड. अरुण केडिया, हिंदू समाज पार्टीचे सुरेंद्र जैन, सरदार वल्लभभाई पटेल पार्टीचे सत्यप्रकाश चौरसिया, अपक्ष बाबूराव शिंदे व मोहम्मद शेख आदींनी अर्ज भरले.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु-पा-७.

# हितेंद्र व क्षितिज ठाकूर यांनी शक्तिप्रदर्शन करीत भरले अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्याचा शेवटचा दिवस असून, सर्वच पक्षांची धावपळ सुरू असल्याचे दिसत आहे. वसई मतदारसंघातून सोमवारी हितेंद्र ठाकूर यांनी तर नालासोपारा मतदारसंघातून क्षितिज ठाकूर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी बविआने शक्तिप्रदर्शन केले. पिवळ्या झेंड्यांसह पिवळ्या वेशभूषेत हजारो कार्यकर्ते, पक्षाचे पदाधिकारी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

हितेंद्र ठाकूर यांनी सकाळीच विरारचे ग्रामदैवत असलेल्या जीवदानी देवीचे आशीर्वाद घेऊन नंतर ते उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मार्गस्थ झाले. यावेळी कार्यकर्त्यांकडून भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ढोल-ताशा, पिवळे झेंडे आणि पताके मिरवत रॅली काढण्यात आली. यावेळी हितेंद्र ठाकूर यांची लढत काँग्रेसच्या विजय पाटील आणि भाजपच्या स्नेहा दुबे यांच्याशी होणार आहे.





वसई विधानसभा मतदारसंघातून बविआचे सर्वेसर्वा आ. हितेंद्र ठाकूर यांनी, तर नालासोपारा मतदारसंघातून आ. क्षितिज ठाकूर यांनी सोमवारी अर्ज सादर केले.

### यांची उपस्थिती

दोघांचे अर्ज दाखल करतेवेळी माजी खा. बळीराम जाधव, माजी महापौर प्रवीणा ठाकूर, ज्येष्ठ नेते बबनशेठ नाईक, मनपाचे प्रथम उपमहापौर सगीर डांगे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक कोलासो, माजी उपमहापौर उमेश नाईक आदी उपस्थित होते.

### रॅलीत हजारो सहभागी

नालासोपारा विधानसभा मतदारसंघाचे बविआचे विद्यमान आमदार क्षितिज ठाकूर यांनी सोमवारी दुपारी उमेदवारी अर्ज दाखल केला. हजारो कार्यकर्ते यावेळी आपल्या दुचाकी आणि चारचाकी वाहनांना पिवळे झेंडे बांधून रॅलीत सहभागी झाले होते. नालासोपारा पश्चिम येथील बविआच्या भवन पक्ष कार्यालयातून ते मनपा मुख्यालयापर्यंत रॅली काढण्यात आली.

पुढारी पा-नं-८


# फटाक्यांच्या दुकानांवर कारवाई

## पाण्याचे फवारे मारून फटाके केले निकामी

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिका आयुक्त संजय काटकर यांच्या निर्देशानुसार मोकळ्या जागांवर फटाके विक्रीचे स्टॉल्स लावण्यासाठी प्रशासनाकडून परवानगी देण्यात येत आहे. मात्र काही दुकाने विनापरवानगी लोकवस्तीच्या ठिकाणी फटाक्यांची दुकाने थाटत असल्याचे निदर्शनास आल्याने अशा दुकानांवर अग्निशमन विभागाने कारवाई करीत दुकानांतील फटाक्यांवर पाण्याचे फवारे मारून ते निकामी केले. तर काही दुकानांतील फटाके जप्त करीत ते जमिनीत पुरले.

यंदाच्या दिवाळी सणानिमित्त फटाके विक्रीकरीता उच्च न्यायालयाच्या नियमांचे तंतोतंत पालन व्हावे, तसेच हि दिवाळी सुरक्षितपणे साजरी करता यावी, यासाठी शहरात महापालिकेने ठरवुन दिलेल्या जागांवर तसेच खाजगी मोकळ्या जागांवर फटाके विक्रीस परवानगी देण्याचे धोरण हाती घेतले आहे. या धोरणाची अंमलबजावणी अगदी काटेकोरपणे



व्हावी, याकरीता महापालिकेच्या अग्निशमन विभागाने अनधिकृतपणे फटाके विक्री करणाऱ्या दुकाने व स्टॉल्सवर धडक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. या कारवाईत अग्निशमन विभागाने अनधिकृतपणे फटाके विक्री करणाऱ्या दुकानांतील फटाक्यांच्या मालावर पाण्याचे फवारे मारुन फटाके निकामी केले. तर काही दुकानांतील फटाके जप्त करून ते साठवुन न ठेवता जमिनीत पुरण्याची कारवाई अग्निशमन विभागाकडून करण्यात आली. या कारवाई अंतर्गत एकुण १८ फटाक्यांच्या दुकानांवर कारवाई करण्यात आली. त्यापैकी ७ दुकानांतील फटाक्यांवर पाण्याचे फवारे मारून फटाके निकामी करण्यात आले. तर ४ दुकानांतील फटाके जप्त करून ते जमिनीत पुरण्यात आले. उर्वरीत ७ फटाक्यांची दुकाने पुर्णत: बंद करण्यात आली.

याचप्रमाणे अग्निशमन विभागाचा ना हरकत दाखला प्राप्त केलेल्या फटाक्यांची दुकाने नियमांचे उल्लंघन करीत असल्याचे आढळून आल्यास त्या दुकानांना दिलेले ना हरकत दाखले रद्द करण्याचे आदेश आयुक्तांनी अग्निशमन विभागाला दिले आहेत. विना परवानगी तसेच अनधिकृतपणे फटाक्यांची विक्री रोखण्याकरीता अग्निशमन विभागाचे २ अग्निशमन केंद्र अधिकारी, ४ सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी व २५ कर्मचाऱ्यांसह १ वॉटर टेंडर, १ रस्क्यु वाहन, २ मिनी वॉटर टेंडर, २ पिक अप वाहन तैनात करण्यात आले आहेत. तर बेकायदेशीर फटाके विक्री करणाऱ्या दुकानांवर केलेल्या कारवाईत अतिरीक्त आयुक्त , उपायुक्त यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला.

Scanned with OKEN Scanner

पुढारी पृ.पा.२.    पुढारी पृ.पा.३.

# बेकायदा फटाके विक्रेत्यांविरोधात पालिका प्रशासन ॲक्शनमोडवर

## मिरा-भाईंदरमध्ये १८ दुकानांवर कारवाई

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

मिरा भाईंदर महापालिकेच्या अग्निशमन विभागाने रविवारी बेकायदेशीर फटाके विक्री करणाऱ्यांवर अनोख्या पध्दतीने कारवाई केली. अशा विक्रेत्यांच्या फटाक्यांवर पाणी मारून ते भिजवून निकामी करण्यात आले तसेच जप्त केलेले फटाके जमिनीत पुरण्यात आले. यामुळे बेकायदेशीरपणे फटाके विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

फटाक्यांची विक्री करताना कुठलीही दुर्घटना घडू नये यासाठी मिरा भाईंदर महापालिकेने उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सुरक्षित फटाके विक्रीचे धोरण तयार केले होते. त्यानुसार खासगी मोकळ्या जागेवर, मैदानावर विक्रीसाठी परवानगी दिली होती. मात्र तरी देखील अनेक ठिकाणी या नियमांचे उल्लंघन करून फटाके विक्री करण्यात येत होती. त्यावर कारवाई करण्यासाठी आयुक्त संजय काटकर यांनी अग्निशमन विभागाचे बेकायदेशीर फटाके विक्री पथक स्थापन केले. रविवारी या पथकाने अनधिकृतपणे फटाके विक्री व्यवसाय करणाऱ्या व्यवसायांवर कारवाई केली. या कारवाईत अनधिकृतपणे फटाका विक्री व्यवसाय करणाऱ्या दुकानातील फटाक्यांच्या मालावर अग्निशमन वाहनातील पाणी मारुन फटाके निकामी केले. काही ठिकाणी माल जप्त करण्यात आला व जप्त केलेला माल साठवुन न ठेवता तो माल जमिनीत पुरण्यात आला. अग्निशमन विभागाने रविवारी एकुण १८ दुकानांवर कारवाई केली. त्यापैकी ७ दुकानात पाणी मारुन फटाके भिजविण्यात आले, तर ४ दुकानातील माल जप्त करण्यात आला. ७ दुकाने पुर्णत: बंद करण्यात आली. याच बरोबर अग्निशमन विभागाचा 'नाहरकत दाखला' (एनओसी) प्राप्त करूनही नियमांचे उल्लंघन करणार्या दुकानांचे 'ना हरकत दाखले' रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.या पथकात अग्निशमन विभागाचे २ अग्निशमन केंद्र अधिकारी, ४ सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकाऱ्यांसह २५ कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते या ताफ्यात १ वॉटर टेंडर, १ रेस्क्यु वाहन, इत्यादी वाहनांचा समावेश होता.

# अमली पदार्थाची विक्री; तरुणाला अटक

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी आलेल्या आरोपीला काशिमीरा पोलिसांनी अटक केली आहे. काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत अच्छेलाल चौहान (२०) रा. रूम नं. ३, न्यू शिवरत्न सोसायटी, साईबाबा मंदिराजवळ, मीरा गावठाण हा ओमसाई हरिधाम सोसायटीच्या गेट समोरील रस्त्यावर स्वत: जवळ ९ ग्रॅम वजनाचा मेफेड्रोन (एमडी) हा अमली पदार्थ विक्री करण्यासाठी घेऊन आला असताना पोलिसांना मिळून आला.

पोलीसांनी त्याला अटक करून त्याच्याविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्य व मनो व्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमाच्या विविध कलम अंतर्गत काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास काशिमीरा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिवाजी खाडे हे करत आहेत.

# घर देण्याच्या नावाखाली फसवणूक

**पालघर :** घर देण्याच्या नावाखाली रेणू सिंग या महिलेची फसवणूक झाल्याचा प्रकार वालीव पोलीस ठाणे क्षेत्रांमध्ये घडला आहे. दीपिका खोडतरकर व महेश खोडतरकर या दोघांनी घर देण्याच्या नावाखाली १४ लाख ७० हजार रुपयांच्या जवळपासची फसवणूक केली आहे. पैसे परत दिले नाहीत व घरही मिळाले नाही म्हणून सिंग यांनी या दोघांकडे पैसे मागितले. यातील साडेचार लाख रुपये या दोघांनी परत दिले व बाकीचे दिले नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे समोर येता रेणू सिंग यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दोघांवरही फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विरारमध्ये घरफोडी

**पालघर :** विरारमध्ये झालेल्या घरफोडीतून दागिने व रोख रक्कम लंपास करण्यात आली आहे. पोलीस ठाणे हद्दीमधील कोपरी रुद्राक्ष अपार्टमेंटमध्ये ही घरफोडी झाल्याचा प्रकार समोर आला आहे. संगीता विश्वकर्मा यांच्या घरातून चोरट्यांनी दोन लाख ३१ हजार रुपयांचे दागिने व रोख रक्कम असा मुद्देमाल चोरून नेला. शुक्रवारची ही घटना असून ही घटना समोर आल्यानंतर विश्वकर्मा यांच्या तक्रारीनुसार विरार पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with OKEN Scanner

पुढारी पा.नं.३.

# भाजपच्या एका जागेवर दोघांचा दावा

## मिरा-भाईंदरमधून आ. गीता जैन, नरेंद्र मेहतांनी भरले उमेदवारी अर्ज





**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदरमधून भाजपच्या एका जागेवर दोघांनी दावा केला आहे. अपक्ष आ. गिता जैन यांच्यासह माजी आ. नरेंद्र मेहता यांनी देखील भाजप व अपक्ष म्हणून तर मेहता यांच्या पत्नी सुमन यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला. महाविकास आघाडीचे उमेदवार काँग्रेसचे माजी आ. मुझफ्फर हुसैन, मनसेचे संदीप राणे, अपक्ष म्हणून माजी नगरसेवक अरुण कदम आदी ११ जणांनी १४५ मिरा-भाईंदर विधानसभा मतदार संघातून सोमवारी निवडणूक निर्णय अधिकारी सुनील भुताळे यांच्याकडे एकूण १९ उमेदवारी दाखल केले.

जैन व मेहता हे भाजपमधून निवडणूक लढविण्यास इच्छुक असले तरी भाजपने सोमवारी उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केल्यानंतरही त्यात मिरा-भाईंदरमधील अधिकृत उमेदवाराच्या नावाचा उल्लेख टाळल्याने दोन्ही इच्छुकांच्या समर्थकांची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे.

### मनसेचे संदीप राणेंसह एकूण १९ अर्ज

भाजपचे तिकीट मिळविण्यासाठी दोन्ही इछुक जोरदार प्रयत्न करीत असून अर्ज भरण्याच्या आदल्या दिवशी जैन या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर एबी फॉर्म घेण्यासाठी पोहोचल्या होत्या. मात्र त्यांना एबी फॉर्म न मिळाल्याने हिरमुसले होऊन माघारी परतावे लागले.

दरम्यान पक्षाकडूनच त्यांना बोलावणे आले होते, अशी चर्चा त्यांच्या समर्थकांकडून रंगविण्यात आली होती. यानंतरही त्यांनी सोमवारी भाजपसह अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरले असून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी त्यांनी रॅलीद्वारे शक्तिप्रदर्शन केले होते. अर्ज भरतेवेळी त्यांच्यासोबत त्यांचे पती भरत व काही निवडक समर्थक उपस्थितीत होते. याखेरीज भाजपचा एकही नेता व पदाधिकारी उपस्थित नव्हता. तरीदेखील जैन यांनी भाजपकडून उमेदवारी मिळण्याची आस बाळगून ठेवली असून त्यांची हि आशा फलदायी ठरेल कि अपयशी, हे पक्षाच्या निर्णयावर अवलंबून राहिल्याचेच दिसून आले आहे.

याचप्रमाणे मेहता यांनी देखील भाजपसह अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला असून त्यांच्या पत्नी सुमन यांनी सुद्धा अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला. त्यांनी देखील रॅलीद्वारे जोरदार शक्तिप्रदर्शन करीत निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय गाठले. यावेळी मेहता यांनाच पक्षाकडून अधिकृत उमेदवारी मिळेल, अशी चर्चा पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये सुरु होती. अर्ज भरतेवेळी मेहता यांच्यासोबत जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा, माजी नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील, प्रशांत दळवी, भगवती शर्मा आदी उपस्थित होते. मेहता यांनी देखील भाजपकडून उमेदवारी मिळण्याची आस बाळगली असून त्यांच्यासह जैन यांचे डोळे भाजपच्या एबी फॉर्म मिळण्याकडे लागले आहेत. त्यात कोण बाजी मारेल, हे दुसऱ्या दिवशी स्पष्ट होणार आहे.

### महाविकास आघाडीचे उमेदवार मुझफ्फर हुसैन यांचा अर्ज दाखल

महाविकास आघाडीचे उमेदवार मुझफ्फर हुसैन यांनी देखील बाईक रॅलीद्वारे शक्तिप्रदर्शन करीत सोमवारी उमेदवारी अर्ज भरला. यावेळी त्यांच्यासोबत स्थानिक ज्येष्ठ नेते लियो कोलासो, माजी नगरसेवक अनिल सावंत, उबाठाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर म्हात्रे आदी उपस्थित होते. यांसह मनसेचे संदीप राणे, अपक्ष म्हणून माजी नगरसेवक अरुण कदम आदी ११ जणांनी सोमवारी एकूण १९ उमेदवारी अर्ज भरले.

Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता ५-११-४.

## 'प्रहार जनशक्ती'ची धनंजय गावडे यांना उमेदवारी

**वसई :** नालासोपारा मतदार संघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेले शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे माजी नगरसेवक असलेले धनंजय गावडे यांना अखेर प्रहार जनशक्ती पक्षातर्फे उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

नालासोपारा मतदार संघातून निवडणूक लढविण्यासाठी धनंजय गावडे हे मागील काही महिन्यांपासून सक्रिय झाले होते. शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षातून उमेदवारी मिळेल अशी आशा होती. मात्र महाविकास आघाडीच्या जागा वाटपाच्या समीकरणात काँग्रेसने संदीप पांडे यांना उमेदवारी घोषित केली. आता गावडे यांना प्रहार जनशक्ती पक्षातर्फे मेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

## स्नेहा दुबे यांना भाजपची उमेदवारी

**वसई :** वसई विधानसभा मतदारसंघातून भाजपने स्नेहा दुबे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्या माजी आमदार विवेक पंडीत यांच्या कन्या असून त्यांचे पती नवीन दुबे शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षात आहेत.



# काँग्रेसची उमेदवारी बविआच्या पथ्यावर

### अपक्ष धनंजय गावडे यांना शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाची साथ?

**सुहास बिऱ्हाडे, लोकसत्ता**

**वसई :** नालासोपारा विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे अस्तित्व नसतानाही काँग्रेसने ही जागा घेऊन संदीप पांडे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. यामुळे महाविकास आघाडीमध्ये नाराजी पसरली आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने अपक्ष उमेदवार धनंजय गावडे यांना साथ देण्याचा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे पांडे यांच्या उमेदवारीमुळे उत्तर भारतीयांच्या मतांचे विभाजन होणार आहे. या बाबी बहुजन विकास आघाडीच्या पथ्यावर पडणार आहेत.

नालासोपारा हा पालघर जिल्ह्यातील सर्वात मोठा मतदारसंघ असून त्यात सुमारे ६ लाख मतदार आहेत. या मतदारसंघात बहुजन विकास आघाडीचे क्षितिज ठाकूर हे विद्यमान आमदार असून सलग तीन वेळा त्यांनी येथून निवडणूक जिंकली आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून या मतदारसंघात उत्तर भारतीय मतदारांची संख्या वाढत असल्याने भाजपसाठी हा सुरक्षित मतदार मानला जातो. लोकसभा निवडणुकीत भाजपला बविआपेक्षा ७१ हजारांहून अधिक मते मिळाली होती. भाजपने यंदा राजन नाईक यांना उमेदवारी दिली आहे, तर बहुजन विकास आघाडीतर्फे आमदार क्षितिज ठाकूर चौथ्यांदा निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यामुळे या दोन्ही पक्षांत तुल्यबळ लढत अपेक्षित होती.

महाविकास आघाडीचा घटक असलेल्या शिवसेना (उद्धव ठाकरे) या पक्षाची येथे काही निर्णायक मते आहेत. पण ही जागा काँग्रेसच्या वाट्याला गेली. काँग्रेसकडे स्थानिक सक्षम उमेदवार नव्हता. त्यामुळे आगरी सेनेचे कैलास पाटील तसेच शिवसेनेचे माजी नगरसेवक धनंजय गावडे यांनी उमेदवारी मिळविण्याचे जोरदार प्रयत्न केले होते. परंतु काँग्रेसने अचानक रविवारी संध्याकाळी संदीप पांडे यांची उमेदवारी घोषित केल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या. पांडे यांच्या उमेदवारीमुळे खुद्द काँग्रेसमध्येही नाराजी पसरली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे एकेकाळचे साहाय्यक अशी त्यांची ओळख आहे. ते मतदारसंघाच्या बाहेरील असल्याने त्यांना कुणी ओळखत नाही. अशा अनोळखी उमेदवाराला काँग्रेसने तिकीट का दिले, असा सवाल कार्यकर्त्यांनी केला आहे.

### भाजपमध्ये चिंतेचे वातावरण

- संदीप पांडे यांच्या उमेदवारीचा फायदा अप्रत्यक्षपणे बहुजन विकास आघाडीला होणार असल्याचे सांगितले जात आहे. पांडे हे उत्तर भारतीय असल्याने भाजपच्या पारंपरिक मतांचे विभाजन होणार आहे. दुसरीकडे शिवसेनेचे माजी नगरसेवक यांनी प्रहार पक्षातर्फे निवडणूक अर्ज भरण्याचे ठरवले आहे. त्यामुळे शिवसैनिकांनी गावडे यांना साथ देण्याचा निर्णय घेतला आहे.
- पांडे यांच्या उमेदवारीने शिवसैनिक उघडपणे गावडे यांना पाठिंबा देऊ लागले आहेत. दुसरीकडे प्रतिस्पर्धी भाजप कमकुवत होऊ लागल्याने बविआ कार्यकर्ते मात्र आनंदात आहेत. राजीव पाटील यांचे बंड शमल्यानंतर बविआचे कार्यकर्ते उत्साहात आहेत. पांडे यांच्या मतांमुळे उत्तर भारतीय मतांचे विभाजन, महाविकास आघाडीची मते धनंजय गावडे यांच्याकडे वळण्याची शक्यता पाहता भाजपमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

# प्रदूषणकारी प्रकल्प सुरूच

## मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक कोंडीसह धुळीची समस्या

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** महामार्गावरील प्रदूषण करणाऱ्या सिमेंट काँक्रीटच्या प्रकल्पांवर गुन्हे दाखल होऊनही ते बंद करण्यात आले नाहीत. त्यामुळे महामार्गावर प्रदूषण सुरूच आहे. एकीकडे महामार्गावरील कामामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी आणि दुसरीकडे धुळीचे प्रदूषण अशा विळख्यात वाहनचालक अडकले आहेत.

वसई, विरार शहर हे झपाट्याने विकसित होऊ लागले आहे. याच अनुषंगाने मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गालगत विविध ठिकाणी सिमेंट काँक्रीटचे (आरएमसी) प्रकल्प उभारण्यात आले आहेत. या कारखान्यातून दररोज अवजड वाहने, मिक्सर तसेच वाळूची वाहतूक करणारी वाहने ये-जा करत असतात. मात्र हे प्रकल्प मालक पर्यावरणाच्या दृष्टीने कोणतेच नियम पाळत नाहीत. प्रदूषण रोखण्याची कोणतीच यंत्रणा नसल्याने या कारखान्यातून सतत धुळीचे प्रदूषण होत असते. वाढत्या धूळ आणि प्रदूषणामुळे हवेची गुणवत्ता ढासळून नागरी आरोग्यावरही याचा मोठा परिणाम होऊ लागला आहे. प्रकल्पातून सतत उडणाऱ्या धुळीने येथील निसर्गरम्य परिसराची धूळदाण होऊ लागली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने या प्रकल्पांना नोटिसा बजावल्या होत्या. वसई-विरार महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी या प्रकल्पांच्या विरोधात कडक कारवाई सुरू केली होती. महापालिकेच्या विशेष नियोजन प्राधिकरण विभागाने महामार्गावरील मालजीपाडा गावात असलेल्या नऊ प्रकल्पांविरोधात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५२, ५३, ५४ अंतर्गत हे गुन्हे दाखल केले होते. मात्र गुन्हे दाखल करूनही प्रकल्प बंद करण्याची कारवाई नायगाव पोलिसांनी केलेली नाही. वाहतूक कोंडी आणि धूळ यामुळे महामार्गावरून जाणाऱ्या वाहनचालक तसेच ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे.



### पोलिसांकडून कारवाईची अपेक्षा

आम्ही सर्वच्या सर्व ९ प्रकल्पांविरोधात गुन्हे दाखल करून अहवाल सादर केला आहे. मात्र प्रकल्प बंद करण्याची कारवाई पोलिसांनी करणे अपेक्षित आहे. याबाबत आम्ही वरिष्ठ स्तरावरून पाठपुरावा करत आहोत, अशी माहिती पालिकेचे साहाय्यक आयुक्त मोहन संख्ये यांनी सांगितले.

# जप्त केलेल्या वाहनांकडे वाहनधारकांची पाठ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** वसई, विरार शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी वाहतूक पोलिसांकडून कारवाई केली जाते. तर काही वेळा वाहने जप्तही केली जातात. मात्र जप्त केलेली वाहने घेऊन जाण्याकडे वाहनचालकांनी पाठ फिरवली आहे. १५ दिवसांत जप्त केलेली वाहने घेऊन जाण्याचे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

वसई, विरार शहरात काही वाहनचालक नियमांचे उल्लंघन करून वाहने चालवीत असतात. तर काही वाहनचालक धोकादायक पद्धतीने वाहने चालवितात त्यावर वाहतूक विभागाकडून कारवाई केली जाते. काही वेळा वाहने जप्तही केली जातात. विरार वाहतूक परिमंडळ-३ यांनीसुद्धा वाहने जप्तीची कारवाई केली होती. मात्र ती वाहने परत घेऊन जाण्यासाठी वाहनचालक पुढे येत नसल्याने धूळखात पडली आहेत. येत्या १५ दिवसात वाहन मालक व चालक यांनी वाहतूक नियंत्रण शाखा-विरार, वाहतूक परिमंडळ-३ यांच्या कार्यालयात स्वतः येऊन कायदेशीर दंड भरून या वाहनांवरील प्रकरणाचा त्वरित निपटारा करावा, असे आवाहन वाहतूक विभागाने केले आहे. जर कोणी पुढे आले नाही तर वाहन विनादाव्याचे घोषित करून त्यांच्या वाहनांची कायदेशीर विल्हेवाट लावण्यात येईल, असे वाहतूक नियंत्रण शाखा विरारचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत लांगी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्राद्वारे केले आहे. या धूळखात पडलेल्या वाहनांमध्ये यामध्ये रिक्षा, दुचाकी इत्यादी ६४ वाहनांचा यामध्ये समावेश आहे. २१ वाहनांच्या मालकांची नावे व पत्ते पोलिसांना सापडलेली नाहीत. यामध्ये तीन वाहनांचे क्रमांक फलकच नाही असे पोलिसांनी सांगितले आहे.



Scanned with OKEN Scanner

म. टा. ५-११-१९.

# नागरिकांची सुरक्षा धोक्यात

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

## रस्त्यालगत व गर्दीच्या ठिकाणी फटाकेविक्री, मनपा प्रशासनाचे दुर्लक्ष



मिरा-भाईंदरमध्ये विक्रेत्यांना केवळ खुल्या मैदानात फटाकेविक्रीस मुभा देण्यात आली आहे. मात्र, त्यानंतरही रहदारी असणाऱ्या रस्त्याच्या कडेला व रेल्वेस्थानक परिसर आदी गर्दीच्या ठिकाणी दुकाने थाटून खुलेआम फटाकेविक्री सुरू आहे. परिणामी नागरिकांची सुरक्षा धोक्यात आली आहे. महापालिकेकडून मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसून येत आहे.

मिरा-भाईंदर मनपाकडून शहराच्या विविध भागात असणाऱ्या शासकीय व खासगी १२ मैदानांत फटाकेविक्री करण्यास जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिवाळीच्या अनुषंगाने फटाकेविक्रीसंदर्भात उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. त्यानुसार रहिवासी क्षेत्रात फटाके विक्रीस मनाई करण्यात आली आहे. तसेच नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने केवळ मोकळ्या मैदानात फटाकेविक्रीस मुभा देण्यात आली आहे. त्या व्यतिरिक्त इतरत्र फटाके विक्रीची दुकाने लावू नये ,असे महापालिकेचे सक्त आदेशही आहेत.

मात्र, त्यानंतरही रस्त्याच्या कडेला असणाऱ्या मोकळ्या जागेत, भर रस्त्यावर व गर्दीच्या ठिकाणी फटाकेविक्रीची दुकाने लावण्यात आहेत. मिरा रोड रेल्वेस्थानक परिसरात मोठी गर्दी असते. येथे देखील फटाकेविक्रीची दुकाने लावण्यात आली आहेत. तर, मिरारोड व भाईंदर परिसरातील रहदारी असणाऱ्या रस्त्यालगतच खुलेआम फटाकेविक्री सुरू आहे. यातील काही दुकानांकडे परवानगी नाही. तर, काहींना मनपासह पोलिसांकडून परवानगी देण्यात आली असल्याचे म्हटले जात आहे.

यामुळे फटाक्यांच्या दुकानाला आग लागल्यासारखी कोणती घटना घडल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. असे असले तरी मनपाकडून संबधित दुकानांवर कारवाई करण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे मनपा प्रशासन एखादी मोठी दुर्घटना घडण्याची वाट पाहत आहे का ? असा सवाल उपस्थित केला जात आहे. सूत्रांनी दिलेला माहितीनुसार अग्निशमन दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा या दुकानदारांना आशीर्वाद असल्याचे समजते.

लोकमत ५-११-१९.

# नरेंद्र मेहता, गीता जैन यांचे भाजपसह अपक्ष म्हणून अर्ज

**भाईंदर :** १४५ विधानसभा मतदारसंघातून इच्छुक उमेदवारांनी सोमवारी शक्तिप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यात महाविकास आघाडीकडून मुज्जफर हुसेन, मनसेतर्फे संदीप राणे यांचा समावेश आहे. महायुतीमधील जागेचा पेच न सुटल्याने नरेंद्र मेहता आणि गीता जैन यांनी अपक्ष तसेच भाजपतर्फे उमेदवारी अर्ज दाखल केले.

राज्यभरात महायुतीतर्फे उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली असली, तरी मिरा-भाईंदर १४५ जागेवरून उभा राहिलेला तिढा सुटू शकलेला नाही. त्यामुळे ही जागा आपल्याला मिळावी म्हणून गीता जैन आणि नरेंद्र मेहता यांच्यामध्ये रस्सीखेच सुरू आहे. जागेचा पेच सोमवारीही सुटू शकला नाही.

२९ ऑक्टोबर रोजी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस असला तरी त्या दिवशी शुभमुहूर्त नसल्यामुळे मेहता व जैन यांनी २८ तारखेलाच आपले अर्ज दाखल केले.

Scanned with OKEN Scanner

नवभारत पृ-पा-२.

# वसई विस क्षेत्र से क्षितिज ठाकुर ने भरा नामांकन पत्र

## रैली में युवाओं की भारी उपस्थिति रही



■ नालासोपारा, (सं). नालासोपारा विधानसभा क्षेत्र से बहुजन विकास आघाड़ी के मौजूदा विधायक क्षितिज ठाकुर ने आज अपना नामांकन पत्र दाखिल किया. इसके पूर्व बहुजन विकास आघाडी अध्यक्ष हितेंद्र ठाकुर ने वसई विधानसभा निर्वाचन क्षेत्र से अपना नामांकन पत्र दाखिल किया. इस अवसर पर वसई पश्चिम के चिमाजी अप्पा मैदान से नामांकन यात्रा निकालकर शक्ति प्रदर्शन किया. वहीं नालासोपारा विस सीट से प्रवीणा ठाकुर ने भी नामांकन दाखिल किया है. इस अवसर पर पूर्व सांसद बलिराम जाधव, नालासोपारा नगर परिषद के पूर्व अध्यक्ष उमेश नाइक, बबनशेठ नाइक, सगीर डांगे, और अन्य वरिष्ठ नेता एवं असंख्य कार्यकर्ता उपस्थित थे. इस रैली में युवाओं की भारी उपस्थिति देखी गई. हजारों युवा कार्यकर्ता अपने दोपहिया और चारपहिया वाहनों पर पीले झंडे लगाकर इस रैली में शामिल हुए. रैली में 400 से अधिक वाहनों का कारवां शामिल था, जो बैंड, ढोल-ताशे के साथ नालासोपारा पश्चिम स्थित बविआ कार्यालय से शुरू होकर वसई-विरार मनपा मुख्यालय तक पहुंचा.

HBT-4

# गीता, मेहता और हुसैन ने किया नामांकन

## कांग्रेस से मुजफ्फर हुसैन और गीता जैन-नरेंद्र मेहता ने निर्दलीय भरा पर्चा







■ **निसं, मीरा-भाईंदर:** सोमवार को मीरा-भाईंदर विधानसभा सीट से विधायक गीता जैन, नरेंद्र मेहता और कांग्रेस से मुजफ्फर हुसैन ने नामांकन दाखिल किया। हालांकि, महायुति की तरफ से अब तक यह सीट घोषित नहीं हुई, लेकिन जैन और मेहता ने निर्दलीय के तौर पर फिलहाल नामांकन कर दिया है। मंगलवार को साफ हो जाएगा कि यह सीट किसे जाएगी, बीजेपी या शिंदे गुट। बता दें कि जैन और मेहता दोनों खुद को बीजेपी का उम्मीदवार बता रहे हैं। सोमवार को उम्मीदवारों ने नामांकन के दौरान शक्ति प्रदर्शन किया। सोमवार को भी मीरा-भाईंदर का नाम शामिल नहीं था।

# हसमुख का शिंदे गुट पर बीजेपी तोड़ने का आरोप

■ **निसं, मीरा-भाईंदर:** मीरा-भाईंदर बीजेपी नेता हसमुख गहलोत ने शिवसेना (शिंदे गुट) पर बीजेपी को तोड़ने का आरोप लगाते हुए ओवला-माजीवाडा (146) विधानसभा से निर्दलीय चुनाव लड़ने की घोषणा की है। वह मंगलवार को नामांकन भरेंगे। ओवला-माजीवाडा सीट से शिंदे गुट के प्रताप सरनाईक उम्मीदवार हैं। गहलोत ने कहा कि शिंदे गुट युतिधर्म का पालन नहीं कर रहा है। बीजेपी के पदाधिकारियों और कार्यकर्ताओं को प्रलोभन दिया जा रहा है। बीजेपी पदाधिकारियों को इनकी पार्टी जॉइन करने का दबाव बनाया जा रहा है। उन्होंने कहा कि बीजेपी आलाकमान को इस मामले में हस्तक्षेप करना चाहिए। अगर आलाकमान दखल देते हैं, तो वह नामांकन वापस ले लेंगे। बता दें कि सरनाईक इस सीट से तीन बार से विधायक हैं। 2019 में वह शिवसेना (अविभाजित) के उम्मीदवार थे और 84,000 वोटों से जीते थे। 2014 में जब बीजेपी-शिवसेना अलग-अलग लड़े थे, तब बीजेपी के उम्मीदवार के सामने सरनाईक की जीत का मार्जिन 11,000 वोट का था।

**कहा, बीजेपी नेताओं को दिया जा रहा पार्टी छोड़ने का प्रलोभन**

Scanned with OKEN Scanner

THE FREE PRESS JOURNAL Pag: 09

# Four get back ₹8.75L lost in cyber frauds

**Suresh Golani**
MIRA-BHAYANDAR

Four persons, who collectively lost more than Rs8.75 lakh in separate online frauds, got their money back, thanks to the cyber cell attached to the Mira Bhayandar-Vasai Virar police and the Kashigaon cops.

The police received a complaint from a Kashimira resident, Shrihari Ravindra, 43, who was duped of over Rs5.16 lakh in a work from home scam wherein the 'job' was to like videos and rate hotels.

The other three complainants lodged their grievances on the National Cybercrime Reporting Portal. They were cheated on pretexts like fake stock investment app, credit card updates and insurance renewal.

Scanned with OKEN Scanner